पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्ट
भारतरत्न अटलविहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, पुणे.
REG.NO.F54459/PUNE, DATE-13/8/2020, MAHA/461, DATE-10/7/2020
TEL- 020-29980800 E-MAIL: bavmc.pmc@gmail.com

Outward No - PMCMET/२३०७/२०२५-२६ दिनांक २५/०७/२५

प्रति,

विषय:- वैद्यकीय महाविद्यालय एम. बी. बी. एस. प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ करिता आवश्यक असणारे अडमिशन कीट खरेदी करणेकरिता महाविद्यालय व पुणे महानगर पालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर पसिद्ध करणेबाबतचे आमंत्रण पत्र.

संदर्भ:- मा. अधिष्ठाता यांचे एम. बी. बी. एस. प्रवेश प्रक्रिया २०२५ -२६ आवश्यक असणारे स्टेशनरी साहित्य खरेदी करणेबाबतचे मा. अधिष्ठाता यांचे मान्य निवेदन दिनांक २५/०७/२०२५.

खालील अटी व शर्तीनुसार भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयामार्फत वैद्यकिय अभ्यासक्रम **प्रवेश प्रक्रिया (MBBS) २०२५-२६ करिता** आवश्यक स्टेशनरी साहित्य खरेदीकरिता दरपत्रक मागविणेत येत आहे.

दरपत्रक सादरकर्ते यांनी खालील तपशील नुसार खालील नमुन्यात दरपत्रक जी. एस. टी.सह महाविद्यालय आवक-जावक कक्ष येथे सुट्टीचे दिवस वगळून सादर करावेत.

अ. क्र.	साहित्याचे नाव	स्पेसिफीकेशन	परिमाण	आवश्यक नग	प्रती नग दर (जी. एस. टी. वगळून) (रुपयामध्ये)	(जी. एस. टी दर %)आणि प्रती नग जी. एस. टी. रक्कम (रु)	प्रती नग दर (जी. एस. टी. सह) (रुपयामध्ये)	एकुण रक्कम दर (जी. एस. टी. सह) (रुपयामध्ये)
१	डॉक्युमेंट होल्डर (२० पॉकेट्स डिस्प्ले बूक)	८.२७ इंच x ११.६९ इंच, प्लॅस्टिक, कोणत्याही रंगात, २० प्लास्टीक् शीट्स सह	नग	१६०				
२	लॅमिना फाईल	कोणत्याही रंगात, प्लॅस्टिक,लीगल (८.५ इंच x १४ इंच) साइज	नग	३२०				
३	ट्रान्सफरंट शीट प्रोटेक्टर	प्लॅस्टिक ,पारदर्शक, पेपर लीगल साइज	नग	३२०				
४	प्लॅस्टिक फोल्डर	१६ इंच x १२ इंच, प्लास्टीक मध्ये, कोणत्याही रंगात	नग	१६०				
५	बटन फोल्डर	१४ इंच x १० इंच, प्लास्टीक, कोणत्याही रंगात, वरच्या बाजूने उघडणारे (Top opening)	नग	१६०				
६	फेविकॉल	२० ग्रॅम बॉटल	नग	१६०				

Scanned with OKEN Scanner

अ. क्र.	साहित्याचे नाव	स्पेसिफीकेशन	परिमाण	आवश्यक नग	Unit price without GST (in Rs)	GST Rate per unit (in%) + GST Amount (in Rs)	Per unit Total Amount with GST (in Rs)	Total amount (with GST) in RS
७	पेन	वॉल पेन, निळ्या शाईचा, कोणत्याही नामांकित कंपनीचे	नग	१६०				
८	बाईडर क्लिप	कोणत्याही नामांकित कंपनीचे, ४१ एम एम आकाराचे	नग	१६०				
९	झेरॉक्स संच	महाविद्यालयाने तयार केलेले नमुन्यात व्लॅक ॲंड व्हाइट, ए४ कागदावर (अंदाजे २० ते २५ पाने (सिंगल) = १ संच	संच	१६०				
१०	झेरॉक्स संच	महाविद्यालयाने तयार केलेले नमुन्यात व्लॅक ॲंड व्हाइट, ए४ कागदावर (अंदाजे १२ ते १५ पाने)(सिंगल) = १ संच	संच	५०				

अटी व शर्ती पुढीलप्रमाणे:

१) वरील नमूद तपशील ग्राह्य धरून त्यानुसार सर्व साहित्याचे दर दरपत्रकात सादर करणे आवश्यक आहे. सादरकर्ते यांनी specification स्तंभात स्पेसिफीकेशनसह कंपनी अथवा ब्रॅंडचे नाव नमूद करावे.

२) भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय येथे वरील तक्त्यात नमूद साहित्य खरेदीबाबतचे दरपत्रक मोहोरबंद पाकिटात सादर करणे आवश्यक आहे. दरपत्रकावरील नमूद साहित्य दरानुसार तसेच साहित्याची गुणवत्ता, सेवा याआधारे L1 पुरवठादार यांचे मूल्यमापन केले जाईल.

३) ई मेल अथवा इतर कोणत्याही इलेक्ट्रोनिक माध्यमांद्वारे सादर केलेले दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही.

४) दरपत्रक "अधिष्ठाता, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,पुणे" यांचे नावे बंद पाकिटात महाविद्यालयाचे बारनिशी/टपाल विभागात सकाळी ९.३० ते ५.०० या वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) सादर करणेत यावे. पाकीटाचे अग्रस्थानी **"MBBS प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ करिता आवश्यक स्टेशनरी साहित्य खरेदीकरिता दरपत्रक"** असे ठळक अक्षरात नमूद करावे.

५) प्रवेशप्रक्रियेकरिता सदर साहित्य वितरीत करणेत येणार असलेने आवश्यकता भासल्यास अतिरिक्त साहित्याची मागणी महाविद्यालयामार्फत प्रवेशप्रक्रिये दरम्यान झालेस तातडीने अत्यावश्यक कारणास्तव अतिररक्त कीट पुरवठा पूर्वी मान्य झालेले दराने करणे पुरवठादार यांना बांधनकारक राहील.

६) दरपत्रक सादर करणेचा अंतिम कालावधी **दिनांक ३१/०७/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** राहील. विहित वेळेत व कालावधीत प्राप्त न झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.

७) महाविद्यालयास आवश्यक वरील नमूद सर्व साहित्याचे दर दरपत्रकात नमूद करणे सादरकर्ते यांना बंधनकारक राहील अन्यथा दरपत्रक अपात्र ठरविण्याचे अधिकार महाविद्यालय राखून ठेवत आहे.

८) दरपत्रक सादरकर्ते यांनी बाजारभावाशी सुसंगत, रास्त दर दरपत्रकात नमूद करणे आवश्यक आहे अन्यथा दरपत्रक अपात्र ठरविण्याचे अधिकार महाविद्यालय राखून ठेवत आहे.

९) सादरकर्ते यांनी सादर केलेले दरपत्रक हे एकल असणे गरजेचे आहे. प्रत्येक सादरकर्ते यांना एकच दरपत्रक भरता येईल. दुसऱ्या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तरित्या अथवा संगनमताने साखळी करून दरपत्रक सादर करू नये.

Scanned with OKEN Scanner

१०)दरपत्रकात सादर केलेले दर न्यूनतम पुरवठाधारक निश्चित झाले दिनांकापासून किमान १८० दिवसांकरिता वैध असतील. कोणतेही कारण न देता कोणतेही अथवा सर्व दरपत्रक स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार मा.अधि ष्ठाता, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,पुणे यांचेकडे राखीव राहतील.

११) सदरचे दरपत्रक जी. एस.टी. सह सादर करावे.

१२) सोबत हमीपत्राचा नमूना देणेत आलेला आहे. सदरचा नमूना कंपनीचे लेटरहेडवर सही, मालकाचे नाव व कंपनीचे शिक्क्यासाह दरपत्रकासोबत मोहोरबंद पाकिटात सादर करणे सर्व दरपत्रक सादरकर्ते यांना बंधनकारक राहील.

Prinidhi 25/7/25

डॉ. शिल्पा आ. प्रतिनिधि
अधिष्ठाता (प्र)
भा.अ.बि.वा.वै.महा. पुणे

Scanned with OKEN Scanner

हमीपत्र

मी/आम्ही मेसर्स ---------- या हमीपत्राद्वारे लिहून देतो/देते की, दरपत्रक मागविणाऱ्या खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाबाबत संघर्ष नाही. तसेच खरेदी प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असून दुसऱ्या कोणत्याही संस्थेसोबत संयुक्तरित्या किंवा संगनमताने साखळी करून दरपत्रक भरलेले नाही, असे आढळून आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू याची मला/आम्हाला कल्पना आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

Scanned with OKEN Scanner